# प्रेसनोट

दि.०३/०५/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | शेवगाव पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं. 212 /२०२१ |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७, |
| आरोपीचे नांव व कार्यालय | आरोपी लोकसेवक १)वसंत कान्हु फुलमाळी, पोलीस कॉन्स्टेबल, बक्कल नं.१८०८, वर्ग-३, नेमणुक उपविभागिय पोलीस अधिकारी शेवगाव यांचे वायरलेस ऑपरेटर, २)संदिप वसंत चव्हाण,पोलीस कॉन्स्टेबल,बक्कल नं.५६६,नेमणुक पाथर्डी पोलीस स्टेशन सध्या संलग्न उपविभागिय पोलीस अधिकारी शेवगाव यांचे पथक, ३)कैलास नारायण पवार,पोलीस कॉन्स्टेबल,बक्कल नं.२७१८ नेमणुक शेवगाव पोस्टे सध्या उपविभागिय पोलीस अधिकारी शेवगाव यांचे पथक जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये १५,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | --- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांची वाळुची ट्रक उपविभागिय पोलीस अधिकारी शेवगाव श्री. सुदर्शन मुंढे यांच्या पथकातील कार्यरत वरील नमुद तिन्ही लोकसेवक यांनी दि.०७/०४/२०२१ रोजी पकडली. त्या ट्रकवर कारवाई न करता सोडण्याचे मोबदल्यात व वाळु वाहतुकीसाठी ट्रक चालु देण्यासाठी हप्ता म्हणुन नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/- रुपये लाचेची मागणी केलेबाबत दिलेल्या तक्रारीवरुन दि.०७/०४/२०२१ रोजी आयोजित लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक फुलमाळी, चव्हाण व पवार यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे १५०००/- रुपये लाचेची मागणी करुन ती स्वीकारण्याची तयारी दर्शविली म्हणून दि. ०३/०५/२०२१ रोजी आरोपी लोकसेवक १) वसंत कान्हु फुलमाळी २) संदिप वसंत चव्हाण ३) कैलास नारायण पवार यांचे विरुध्द शेवगाव पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुरनं. २१२/२०२१ ला.प्र.का. सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून नमुद तिन्ही आरोपी सध्या फरार असुन त्यांचा शोध लाप्रवि अहमदनगर चे पथकाकडुन सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:- ९९३०९९७७००

03.05.21

( हरिष खेडकर )

पोलीस उप अधीक्षक

ॲन्टी करप्शन ब्युरो,अहमदनगर